# धुळे महानगरपालिका,धुळे

मा.प्रशासक तथा आयुक्त
नगरसचिव कार्यालय

---

## स्थायी समिती सभा क्रमांक ६ चे इतिवृत्त

---

महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक:-एमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१/नवि१४ दि. २९/१२/२०२३ नुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतूदीत अंतर्भुत केलेल्या कलम ४५२ अ (१अ) अन्वये मा.प्रशासक सो. यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार स्थायी समिती सभेसाठी प्राप्त झालेल्या प्रस्तावांवर निर्णय घेणेसाठी **गुरूवार दिनांक २२/०२/२०२४ सकाळी १२-०० वाजता भारतरत्न स्व.अटलबिहारी वाजपेयी मुख्य सभागृहात आयुक्त तथा प्रशासक श्रीमती अमिता दगडे-पाटील यांच्या अध्यक्षतेखाली** संपन्न झाली. त्या सभेचे इतिवृत्त

सदर सभेस खालील अधिकारी उपस्थित होते.

| **अ.क्र.** | **अधिकाऱ्यांचे नाव** | **पदनाम** |
|---|---|---|
| १. | श्रीमती अमिता दगडे-पाटील | आयुक्त तथा प्रशासक |
| २. | श्रीमती करूणा डहाळे | अति.आयुक्त |
| ३. | श्रीमती शोभा बाविस्कर | उपायुक्त |
| ४. | श्री.हेमंत निकम | उपायुक्त |
| ५. | श्री.गजानन पाटील | मुख्य लेखाधिकारी |
| ६. | श्री.सुनिलकुमार सुर्यवंशी | प्र. मुख्य लेखा परिक्षक |
| ७. | श्री.मनोज वाघ | नगरसचिव |
| ८. | श्री.नवनीत सोनवणे | कार्यकारी अभियंता पा.पू.वि. |
| ९. | श्री.कैलास शिंदे | अभियंता |
| १०. | श्री. पी.डी. चव्हाण | सहाय्यक अभियंता |
| ११. | श्री. एन. के. बागुल | विद्युत अभियंता |
| १२. | श्री.सी. एम. उगले | सहा.अभियंता,पा.पु.वि. |
| १३. | श्री. प्रकाश सोनवणे | कनिष्ठ अभि. नगररचना विभाग |
| १४. | डॉ. एम.आर.शेख | आरोग्याधिकारी |
| १५. | श्री.राजेश वसावे | मुख्य स्वच्छता निरिक्षक |
| १६. | श्री. किशोर सुडके | परवाना विभाग / बाजार विभाग |
| १७. | श्री.चंद्रकांत मोरे | प्र.लेखापाल |
| १८. | श्री.प्रकाश पवार | लिपीक,आस्थापना विभाग |
| १९. | श्री.राजेंद्र माईनकर | प्र.भांडारपाल |
| २०. | श्रीमती कल्पना जाधव | अभिलेखापाल |
| २१. | श्री.चंद्रकांत जाधव | मलेरिया पर्यवेक्षक |
| २२. | श्री.प्रसाद जाधव | अतिक्रमण विभागप्रमुख |
| २३. | श्री.राजेश गायकवाड | लेखापाल,शिक्षण मंडळ |

| | | |
|---|---|---|
| २४. | श्री.संभाजी सुडके | प्र.वाहन विभागप्रमुख |
| २५. | श्री.अतुल पाटील | लिडींग फायरमन |
| २६. | श्री.मधुकर निकुंभे | अधिक्षक, मालमत्ता कर विभाग |
| २७. | श्री.हेमंत पावटे | कनिष्ठ अभियंता, बांधकाम विभाग |
| २८. | श्री.बासित पठाण | सिस्टीम मॅनेजर,संगणक विभाग |

म.नगरसचिव वंदे मातरम या राष्ट्रवंदनेसाठी सर्वांनी उभे रहावे.

**मा.प्रशासक:-** आजच्या सभेचे कामकाजास सुरूवात करण्यात यावे.

विषय क्रमांक:-३८ मागील स्थायी समिती सभा क्र.३३ व ३४ प्रशासकीय स्थायी समिती सभा क्र.१,२ व ३ चे इतिवृत्त वाचून कायम करणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.अभियंता मागील स्थायी समितीचे इतिवृत्त कायम करण्यात यावे.

म.अति.आयुक्त इतिवृत्त वाचून कायम करण्यात यावे.

मा.प्रशासक मागील स्थायी समिती सभा क्र.३३ व ३४ प्रशासकीय स्थायी समिती सभा क्र.१,२ व ३ चे क्रमांश: इतिवृत्त वाचून कायम करण्यात येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ३९ दिनांक २२/०२/२०२४**

मागील स्थायी समिती सभा क्रमांक ३३ दिनांक २८/१२/२०२३ च्या सभेतील धुळे मनपा ठराव ३३० ते ३३५ अखेर क्रमश:वाचून कायम करण्यांत येत आहे.

तसेच स्थायी समिती सभा क्रमांक ३४ दिनांक २९/१२/२०२३ च्या सभेतील धुळे मनपा ठराव ३३६ अखेर क्रमश:वाचून कायम करण्यांत येत आहे.

तसेच प्रशासकीय स्थायी समिती सभा क्रमांक १ दिनांक २३/०१/२०२४ च्या सभेतील धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक १ ते १२ अखेर क्रमश:वाचून कायम करण्यांत येत आहे.

तसेच प्रशासकीय स्थायी समिती सभा क्रमांक २ दिनांक ०१/०२/२०२४ च्या सभेतील धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक १३ ते २० अखेर क्रमश:वाचून कायम करण्यांत येत आहे.

तसेच प्रशासकीय स्थायी समिती सभा क्रमांक ३ दिनांक ०८/०२/२०२४ च्या सभेतील धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक २१ ते ३१ अखेर क्रमश:वाचून कायम करण्यांत येत आहे.

**सही/- x x x**
**अमिता दगडे-पाटील**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-३९ केंद्र व राज्य सरकार पुरस्कृत अमृत २.० अंतर्गत धुळे पाणीपुरवठा योजना स्थापत्य कामाचे निविदा दर मागविण्यात आले.त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.अभियंता केंद्र व राज्य शासनाच्या पुरस्कृत अमृत 2 अभियाना अंतर्गत जी हद्दवाढीची गावे आहे व हद्दवाढ लगतची जी वाढ आहे त्या ठिकाणी पाणी टाकी व पाईपलाईन व इतर बाबींच्या प्रस्तावास मंजूरी दिली होती. मागील सभेत इलेक्ट्रीकल टेंडर होते त्याला मंजूरी दिली. आता

पाईप लाईन टाकणे साठी बांधकामाबाबत ई निविदा प्रसिध्द केली होती. ई निविदेमध्ये आपल्याला 3 ठेकेदारांनी भाग घेतला होता. त्यात जयदिप इन्फ्रा प्रा. लि. यांचे दर सर्वात कमी आले होते. आजच्या दराशी व बाजार भावाशी तुलना करता सदरचे दर 9.72 जास्त दराने आले आहे. सदरचे दरमंजूरीसाठी शासनाच्या एसएलटीसी कडे मंजूरीसाठी सादर करायचे आहे. मंजूरीसाठी सादर.

म.आयुक्त — त्याला निगोशिएशनचे पत्र दिले का?

म.अभियंता — हो दिले होते. त्यांनी 14.50% जादाने केले यासाठी पाईप मिळत नाही. त्या पाईपांच्या दराची 30 % पर्यंत वाढ झाली आहे. मालेगांव येथे 32% जादाने निविदा गेली उल्हासनगरची 27 % जादाने निविदा गेली याचा विचार करता आपल्याकडे दर योग्य वाटतात. मंजूरीसाठी शिफारस करण्यात येत आहे.

म.कार्यकारी अभियंता — सदर प्रस्तावास मान्यता देण्यात यावी.

मा.प्रशासक — सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ४० दिनांक २२/०२/२०२४**

केंद्र व राज्य सरकार पुरस्कृत अमृत २.० अंतर्गत पाणी पुरवठा योजना कामास शासन निर्णय क्र. अमृत २०२३ / प्र.क्र. ३९७ / नवि ३३ दि. १७/१०/२०२३ अन्वये प्रशाकीय मान्यता खर्च रक्कम रु.१४२.७६ कोटी मात्रस शासना कडून मंजुरी प्राप्त आहे.

केंद्र शासन निधी ३३.३३% , राज्य शासना निधी ३६.६७% व स्थानिक स्वराज्य संस्था (मनपा हिस्सा ) ३०% असा योजनेचा आकृतीबंध आहे.

उक्त बाबत त्यानुसार ई- निविदा प्रक्रियेसाठी केंद्र पुरस्कृत अमृत २.० अभियान अंतर्गत दि.१९/१०/२०२२ रोजीच्या शासन परिपत्रकानुसार महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून उपलब्ध करून देण्यात आलेला आदर्श निविदा पुस्तकेनुसार (Model Tender Document ) सबंधित नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेने (PFP) तयार करावेत व त्यामध्ये सदर आदर्श निविदा पुस्तिकेतील तरतुदीपेक्षा कोणतेही वेगळी तरतूद करावयाची असल्यास त्यास सबंधित मुख्य अभियंता , महारष्ट्र जीवन प्राधिकरण यांच्या कडून मान्यता घ्यावी व निविदा प्रक्रिया करण्यापूर्वी त्यास राज्यस्तरीय तांत्रिक समिती ( SLTC) ची मान्यता घ्यावी असे नमूद आहे.

त्यानुसार सदर निविदेत **A.** Price Escalation Clause **B.** Work Addition Pre-Qualification Criteria **C.** Geo- Tagging च्या तरतुदी वाढविणेत आले. त्यास महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांच्या मंजुरी घेवून राज्यस्तरीय तांत्रिक समिती ( SLTC) मंजुरीसाठी रोजी सादर केले.

म.प्रधान सचिव , नवि- २ , महारष्ट्र शासन यांच्या अध्यक्षतेखाली दि. ०४/१२/२०२३ रोजी राज्यस्तरीय तांत्रिक समिती ( SLTC) ची बैठक पार पडली त्यात खालीलप्रमाणे सूचना देण्यात आल्या आहेत.

म.आयुक्त , धुळे मनपा यांनी समिती समोर केलेल्या विनंती Geo- Tagging चा समावेश निविदेत करावा तथापि केवळ Geo- Tagging नसल्यामुळे कोणत्याही निविदा धारकास अपात्र ठरविण्यात येऊ नये व त्यांना Geo- Tagging करणेची संधी द्यावी. पात्र निविदा धारकास Geo- Tagging करण्यास नकार देत असल्यास त्यास अपात्र ठरविण्याचे अधिकार आयुक्त , धुळे मनपा यांना असतील असे नमूद आहे.

उक्त बाबत अमृत २.० अंतर्गत धुळे पाणीपुरवठा योजना अंतर्गत स्थापत्य कामासाठी ई- निविदा सूचना क्र. १६४ सन २०२३-२४ नुसार रु११८.१४ कोटी मात्रची निविदा दै. हिंदुस्थान टाईम्स / लोकसत्ता (मराठी ) / पुण्य नगरी या वृत्तपत्रातून दि.२९/१२/२०२३ रोजी जाहीर निविदा प्रसिद्ध देण्यात आलेली होती. विद्युत व यांत्रिकी कामाबाबत स्वतंत्र निविदा काढण्यात आली आहे. उक्त कामाची ई-निविदा पूर्व बैठक दि.१२/०१/२०२४ रोजी म.आयुक्त तथा प्रशासक यांच्या दालनात ठेवण्यात आली.

उक्त बाबत दि.०१/०१/२०२४ रोजी तांत्रिक लिफाफा उघडण्यात आला. सदर निविदेत एकूण ०३ निविदा धारकांनी सहभाग घेतलेला आहे.

१) मे.जयदिप इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि., धुळे
२) मे.प्रगती कन्सट्रक्शन , लातूर
३) लक्ष्मी सिविल इंजिनीअरिंग सर्विसेस प्रा.लि.

सदर निविदा धारकांचे कागदपात्रांची छाननी धुळे महानगरपालिका व मे.निसर्ग कन्सलटन्सी , नाशिक यांच्या मार्फत करण्यात आली. मे.निसर्ग कन्सलटन्सी , नाशिक यांच्या कडील पत्र क्र. टीएनसि / धुळे / पापुयो / ८९३ दि. ०३/०२/२०२४ रोजीच्या पत्रान्वये वरील तिन्ही निविदा धारकांचे कागदपात्रांची छाननी शिट प्राप्त झाली. कागदपत्रे पूर्ण असल्याने वरील तिन्ही निविदा धारक पात्र झालेले आहे.

उक्त बाबत दि.०९/०२/२०२४ रोजी म.आयुक्त तथा प्रशासक, धुळे महानगरपालिका , धुळे यांच्या दालनात व्यापारी लिफाफा उघडण्यात आले असण खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्त्यात त्यांचे दर सादर केलेले आहे.

| अ.क्र. | कंत्राटदाराचे /ठेकेदराचे नाव | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| १ | **जयदिप इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि.** | **शे.१५.००% जास्तीने** | **सर्वात कमी** |
| २ | मे.प्रगती कन्सट्रक्शन | शे.२०.००% जास्तीने | |
| ३ | लक्ष्मी सिविल इंजिनीअरिंग सर्विसेस प्रा.लि. | शे.२५.००% जास्तीने | |

उक्त कामाची Comparative Statement नुसार मे. जयदिप इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि. निविदा यांचे दर सर्वात कमी असून शे.१५% जास्तीने आलेले आहे. सदरचे कामाचे दर हे अंदाजपत्रकीय दरापेक्षा शे.१५.००% जास्तीचे असल्याने सदर कामाचा राज्य दर सूची ( S.S.R. ) नुसार दराचे पृथ्थिकरण करून सादर करणे बाबत तसेच वाटाघाटी अंती दर कमी करणे बाबत या कार्यालया कडील पत्र क्र. / पापुवि/ ९४९ दि.०९/०२/२०२४ नुसार पत्र देण्यात आले आहे.उक्त बाबत मे.जयदिप इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि. यांच्या कडील पत्र क्र. Ref No. JIPL / 882/2024 दि.१३/०२/२०२४ रोजी दराचे पृथ्थीकरण व दर वाटाघाटी बाबत पत्र दिलेले आहे.

सदरचा स्पर्धात्मक निविदा दर हा निविदेतील अंदाजपत्रकीय दराच्या १५% जादा आहे आणि तो इतर बोलीशी तुलना करता तो कमीत कमी आहे. निविदेतील अंदाजपत्रकीय दरापेक्षा १५% जादा देकाराचे आर्थिक विश्लेषण व सदरचा दर वाटाघाटीनुसार कमी करण्या बाबत लेखी स्वरुपात म्हणणे सादर केलेले आहे.

याबाबत स्ल्युईस वॉल्व च्या निविदा दर व चालू दरसूची मधील यातील फरकचे विवरण पाहता वाटाघाटी अंती **शे.१४.५०% जास्तीने करणे बाबत मे.जयदिप इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि**. यांनी मान्य केलेले आहे.

तसेच मे.निसर्ग कन्सलटन्सी, नाशिक यांना या कार्यालया कडील पत्र क्र. / पापुवि/ ९५० दि.०९/०२/२०२४ अन्वये दराचे पृथ्थिकरण करून सादर करणे बाबत कळविले आहे.

उक्त बाबत मे.निसर्ग कन्सलटन्सी , नाशिक यांच्या कडील पत्र क्र ./ टीएनसी / धुळे पापुयो / ९३० / २०२४ दि. १३/०२/२०२४ पत्रान्वये निविदेतील कामांची चालू दरसूची नुसार येणाऱ्या किमतीचा तपशीलाबाबत एकूण मुल्यांकित किमंतीवर ठेकेदाराच्या सुधारित देकाराची चालू दरसूचीशी तुलना नुसार शे.९.९७२% जादा दराने बाबत पृथ: करण मे.निसर्ग कन्सलटन्सी , नाशिक यांनी सादर केलेले आहे.

याबाबत मे.जयदिप इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि, धुळे यांचे दर शे.१४.५०% जास्तीने आलेले व एकूण मुल्यांकित किमंतीवर ठेकेदाराच्या सुधारित देकाराची चालू दरसूचीशी तुलना नुसार शे.९.९७२% जादा दर व उक्त बाबत वाटाघाटीत निविदा धारकाने दिलेले मुद्दे ०१ ते ०६ पाहता / बाजारभाव पाहता दर योग्य वाटतात. असा अहवाल बांधकाम विभागामार्फत सादर झालेला आहे.

याबाबत म.शहर अभियंता यांचा वाचा क्रं.२ मधील अहवालानुसार **मे.जयदिप इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि.यांचे दर शे. १४.५०% जास्तीने (सद्याच्या दरसूचीनुसार ९.९७२% जादा दराने)** आलेले असून सदर दरास वाचा क्र.१ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे. सदर प्रस्ताव शासन तथा सक्षम प्राधिकरणाकडे सादर करण्यांस शिफारस करण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**अमिता दगडे-पाटील**
**आयुक्त तथा प्रशासक**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-४० माझी वंसुधरा ३.० अंतर्गत मनपाच्या विविध दवाखान्यात १० के.व्ही.पी चे ऑन ग्रीड सो.सि. व वलवाडी फिल्टरेशन प्लांट येथे १० के.व्ही.पी चे ऑन ग्रीड सोलर सिस्टीम बसविणेकामी निविदा दर मागविण्यात आले.त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

म.शाखा अभियंता यामध्ये आपल्याला माझी वसुंधरा 3 अंतर्गत 100% अनुदान प्राप्त झाले आहे. यामध्ये 10 केव्हीपी चे ऑन ग्रीड सोलर सिस्टीम व पास कीट बसवतो आहे. हे मनपाचे विविध दवाखाने व वलवाडी फिल्टरेशन प्लांट येथे बसवणार आहोत. सदर प्रस्तावास मान्यता देणेस शिफारस करण्यात येत आहे.

म.शहर अभियंता सदर प्रस्तावास मान्यता देण्यात यावी.

मा.प्रशासक सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ४१ दिनांक २२/०२/२०२४**

उक्त कामाबाबत धुळे महानगरपालिका स्थायी समिती ठरावानुसार **मा.आयुक्त** धुळे महानगरपालिका यांचे टिप्पणी यांची टिपणी मंजुरी **दि. ०१/०१/२०२४** रोजी अन्वये उक्त कामाबाबत आर्थिक खर्चास मंजुरी देणेत आली आहे.

उक्त कामाबाबत धुळे महानगरपालिका **जा.क्र./विवी/३३० दि.१९-०१-२०२४** अन्वये व **दि.२०-०१-२०२४** च्या **दै.दिव्यमराठी/सकाळ** व धुळे महानगपालिका/महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईट www.mahatender.gov.in वर खुल्या **ई-निविदा** /~~कोटेशन~~ प्रसिद्ध करणेत येवून **दि.०२-०२-२०२४** रोजी निविदा मागविणेत आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत रोखीने बयाणा रक्कम भरून/लेटर प्याड वर निविदा दर सादर केलेले आहेत.

यात विहित कार्यालयीन व ई निविदा प्रक्रियेनुसार **प्रयास इलेक्ट्रोसिस्टम्स,ठाणे प्रायव्हेट लिमिटेड** यांची निविदा सर्वात न्यूनतम दराचे म्हणजेच **रु.७७,०८,०९४/-** इतक्या रकमेची असुन ती अंदाजपत्रकीय दराची आहे. सबब कंत्राटदार **प्रयास इलेक्ट्रोसिस्टम्स,ठाणे प्रायव्हेट लिमिटेड** यांनी सर्वात कमी म्हणजेच **अंदाजपत्रकीय दरास** व प्रस्तावास वाचा क्र.१ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**अमिता दगडे-पाटील**
**आयुक्त तथा प्रशासक**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-४१ धुळे मनपा क्षेत्रामध्ये पाणीपुरवठा केंद्र, उद्यान,अमरधाम येथे सोलर हायमास्ट बसविणे व मुख्य जंक्शन ठिकाणी,शाळा, महाविद्यालय, चौकामध्ये सोलर ब्लिंकर्स बसविणेकामी निविदा दर मागविण्यात आले.त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

म.शाखा अभियंता महासभेचा ठराव झाला होता. त्या योजने मधून हा प्रस्ताव सादर केला आहे. मा. जिल्हाधिकारी यांच्याकडे बैठक झाली होती. त्यात मा. पोलिस अधिक्षक यांनी सूचना केल्या होत्या. शहरामध्ये वळण रस्ते व क्रॉसिंग त्या ठिकाणी ब्लिंकर्स बसवणे आवश्यक आहे. त्या अनुषंगाने 45 स्पॉट आपण आयडेंटीफाय केले आहे. त्यांच्याशी समन्वय करुन आपण ब्लिंकर्स बसवणार आहे. आणि जलकुंभ व पाणीपुरवठा केंद्र येथे सोलर हायमास्ट बसवतो आहे. सदर प्रस्तावास मान्यता देणेस शिफारस करण्यात येत आहे.

मा.प्रशासक ब्लिंकर्स सर्टीफाय पण करुन घ्यायचे ते ठिकाण आणि झालेले काम योग्य झाले आहे क ते पाहून घ्यावे.

म.शहर अभियंता सदर प्रस्तावास मान्यता देण्यात यावी.

मा.प्रशासक सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ४२ दिनांक २२/०२/२०२४**

उक्त कामाबाबत धुळे महानगरपालिका स्थायी समिती ठराव क्र.२४३ दि.१२/०६/२०२३ **मा.आयुक्त** धुळे महानगरपालिका यांचे टिप्पणी यांची प्रशासकीय मान्यता क्र.४३ दि.२४-०१-२०२४ रोजी अन्वये उक्त कामाबाबत रक्कम **रु.१,३२,९७,६१९/-** मात्र खर्चास आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देणेत आली आहे.

उक्त कामाबाबत धुळे महानगरपालिका **जा.क्र./विवी/३३७ दि.२४-०१-२०२४** अन्वये व **दि.२५-०१-२०२४** च्या **दै.देशदूत/वार्ता** व धुळे महानगपालिका/महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईट www.mahatender.gov.in वर खुल्या **ई-निविदा** /~~कोटेशन~~ प्रसिद्ध करणेत येवून **दि.०६-०२-२०२४** रोजी निविदा मागविणेत आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत रोखीने बयाणा रक्कम भरून/लेटर प्याड वर निविदा दर सादर केलेले आहेत.

यात विहित कार्यालयीन व ई निविदा प्रक्रियेनुसार **पंडित इलेक्ट्रिकल्स, धुळे** यांचे दर तुलनेत सर्वात कमी आहे. सबब कंत्राटदार **पंडित इलेक्ट्रिकल्स, धुळे** यांनी सर्वात कमी म्हणजेच **अंदाजपत्रकीय दरास** व प्रस्तावास वाचा क्र.१ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**अमिता दगडे-पाटील**
**आयुक्त तथा प्रशासक**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-४२ अल्पसंख्याक क्षेत्रविकास कार्यक्रम सन २०२३-२४ अंतर्गत प्र.क्र.१३ मध्ये १ ते ५ कामाचे निविदा दर मागविण्यात आले.त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालवर निर्णय घेणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

म.शहर अभियंता अल्पसंख्यांक क्षेत्रविकास कार्यक्रम अंतर्गत प्रभाग क्र. 3 मध्ये सन 23-24 साठी आपण ई निविदा केली होती. यामध्ये सर्वात कमी दर जयेश सतिष मगर यांचे आलेले असून ते अंदाजपत्रकीय दर आहे. स्थायी समितीपुढे शिफारस करण्यात येत आहे.

म.कार्यकारी अभियंता सदर प्रस्तावास मान्यता देण्यात यावी.

मा.प्रशासक सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ४३ दिनांक २२/०२/२०२४**

अल्पसंख्याक क्षेत्र विकास अंतर्गत सन २०२३-२४ अंतर्गत प्रभाग क्र.१३ मधील १ ते ५ कामे करणेचे कामास म. जिल्हाधिकारी सो., यांच्या कडील पत्र क्र. १२ / क / कक्ष — ५ / नपाप्र / बांध / १४८३ दि.२२/१२/२०२३ अन्वये उक्त कामाच्या खर्चास रक्कम रु.९९,६६,५९०/- मात्र रक्कमेस आर्थिक व प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

उक्त कामाबाबत शहर अभियंता मनपा धुळे यांचे पत्र क्र. ४१३,४१४,४१५,४१६,४१७ दि.०७/१२/२०२३ अन्वये रक्कम रुपये ९९,६६,५९०/- तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

यात विहित कार्यालयीन व ई निविदा प्रक्रियेनुसार **जयेश सतिष मगर** यांचे दर **अंदाजपत्रकीय** दराने आहे. सबब कंत्राटदार **जयेश सतिष मगर** यांचे **अंदाजपत्रकीय** दरास व प्रस्तावास वाचा क्र.१ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**अमिता दगडे-पाटील**
**आयुक्त तथा प्रशासक**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-४३ धुळे मनपात विविध विभागातील मानधनावरील अधिकारी व कर्मचारी यांना ६ महिने कालावधीकरीता मुदतवाढ देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

म.लिपिक आस्थापना वि. धुळे मनपातील विविध विभागातील मानधनावरील कार्यरत अधिकारी व कर्मचारी यांची मुदतवाढ संपुष्टात आली आहे. यामध्ये 1 वैद्यकीय अधिकारी 2 रसायन तज्ञ, 8 पंप ऑपरेटर,

5 विजतंत्री, 3 गाळणी निरिक्षक , 6 गाळणी चालक आहे. यांना 6 महिने मुदतवाढ मिळावी यासाठी शिफारस करण्यात येत आहे.

| | |
|---|---|
| म.शहर अभियंता | मुदतवाढीच्या प्रस्तावास मान्यता देण्यात यावी. |
| मा.प्रशासक | सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे. |

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ४४ दिनांक २२/०२/२०२४**

धुळे महानगरपालिकेतील विविध विभागातील मानधनावरील कार्यरत वैद्यकीय अधिकारी,रसायन तज्ञ,पंप ऑपरेटर,विजतंत्री,गाळणी निरीक्षक,गाळणी चालक असे १ ते २५ अधिकारी व कर्मचारी यांची मुदतवाढ प्रस्तावात त्यांच्या नावासमोर नमूद नुसार संपुष्ठात आलेली आहे.

प्रस्तावातील नमूद मानधनावरील अधिकारी व कर्मचारी यांना मुदत संपल्याच्या दिनांकापासून ०५ दिवसाची सेवा खंड करुन एकत्रित मानधनावर पुढील ०६ महिन्याकरिता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ५३(३) नुसार मुदतवाढ देणेस वाचा क्र.१ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**अमिता दगडे-पाटील**
**आयुक्त तथा प्रशासक**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

| | |
|---|---|
| विषय क्रमांक:-४४ | अल्पसंख्याक क्षेत्रविकास कार्यक्रम निधी सन २०२३-२४ अंतर्गत प्र.क्र.३ मध्ये विटाभट्टी व अल्पसंख्याक परिसरात पथदिवे व हायमास्ट लावणेकामी निविदा दर मागविण्यात आले.त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे. |
| म.नगरसचिव | नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले. |
| म.शहर अभियंता | यात अल्पसंख्यांक क्षेत्रविकास कार्यक्रम निधी अंतर्गत सन 23-24 साठी प्रभाग क्र. 3 विटाभट्टी व अल्पसंख्यांक परिसरात पथदिवे व हायमास्ट लावण्यात येणार आहे. यात ई निविदा करण्यात येऊन त्यात मे. बिजासनी एंटरप्राईजेस धुळे यांचे अंदाजपत्रकीय दर आहे आहे. शिफारस व दर मंजूरीसाठी सादर. |
| म.कार्यकारी अभियंता | सदर प्रस्तावास मान्यता देण्यात यावी. |
| मा.प्रशासक | सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे. |

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ४५ दिनांक २२/०२/२०२४**

उक्त कामाबाबत धुळे महानगरपालिका स्थायी समिती ठराव क्र. दि. / /२० मा. आयुक्त/ उपायुक्त धुळे महानगरपालिका यांचे टिप्पणी/ **मा. जिल्हाधिकारी सो**. यांची प्रशासकीय मान्यता/१४८४ दि. २६/१२/२०२३ रोजी अन्वये उक्त कामाबाबत रक्कम **रु. २९,९९,०६५/-** मात्र खर्चास आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देणेत आली आहे.

उक्त कामाबाबत धुळे महानगरपालिका **जा.क्र./वि.वि./३३५ दि.२३/०१/२०२४** अन्वये व **दि. ०६/०१/२०२४** च्या **दै. नवराष्ट्र व दै. समाजसारथी, धुळे** व धुळे महानगपालिका / महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईट www.mahatender.gov.in वर खुल्या ई-निविदा /~~कोटेशन~~ प्रसिद्ध करणेत येवून **दि.२५/०१/२०२४** रोजी निविदा मागविणेत आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत रोखीने बयाणा रक्कम भरून/लेटर प्याड वर निविदा दर सादर केलेले आहेत.

यात विहित कार्यालयीन व ई निविदा प्रक्रियेनुसार **मे. बिजासनी इंटरप्रायझेस, धुळे** यांचे दर तुलनेत सर्वात कमी आलेली आहे. सबब कंत्राटदार **मे. बिजासनी इंटरप्रायझेस, धुळे** यांनी सर्वात कमी म्हणजेच **अंदाजपत्रकीय दरास** व प्रस्तावास वाचा क्र.१ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**अमिता दगडे-पाटील**
**आयुक्त तथा प्रशासक**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-४५ पांझरा नदि किनारी चौपाटी येथील गार्डन येथील विद्युत कामाकरीता १०० के.व्ही.ए.,Transformer,D.P.Strcture, विद्युतीकरण, Decorative Works, इलेक्ट्रिल पोल,स्ट्रीट लाईटसह बसविणेकामी निविदा दर मागविण्यात आले.त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

म.शहर अभियंता यात आपण ई निविदा केली होती. सदरची कामाची रक्कम 71 लाख 92 हजार आहे. यात रेडीयन्स इलेक्ट्रीकल धुळे यांची निविदा अंदाजपत्रकीय दराने प्राप्त झाली आहे. शिफारस व मंजूरीसाठी सादर.

म.शाखा अभियंता सदर प्रस्तावास मान्यता देण्यात यावी.

मा.प्रशासक सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ४६ दिनांक २२/०२/२०२४**

उक्त कामाबाबत धुळे महानगरपालिका स्थायी समिती ठरावानुसार **मा.आयुक्त** धुळे महानगरपालिका यांचे टिप्पणी यांची प्रशासकीय मान्यता क्र.१८ दि.२९-११-२०२३ रोजी अन्वये उक्त कामाबाबत रक्कम **रु.७१,९२,७२५/-** मात्र खर्चास आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देणेत आली आहे.

उक्त कामाबाबत धुळे महानगरपालिका **जा.क्र./विवी/३२९ दि.१८-०१-२०२४** अन्वये व **दि.१९-०१-२०२४** च्या **दै.देशदूत/वार्ता** व धुळे महानगपालिका/महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईट www.mahatender.gov.in वर खुल्या ई-निविदा /~~कोटेशन~~ प्रसिद्ध करणेत येवून **दि.२५-०१-२०२४** रोजी निविदा मागविणेत आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत रोखीने बयाणा रक्कम भरून/लेटर प्याड वर निविदा दर सादर केलेले आहेत.

यात विहित कार्यालयीन व ई निविदा प्रक्रियेनुसार **रेडीयन्स इलेक्ट्रिकल्स, धुळे** यांचे **अंदाजपत्रकीय** दर तुलनेत सर्वात कमी आलेले आहे. सबब कंत्राटदार **रेडीयन्स इलेक्ट्रिकल्स, धुळे** यांचे **अंदाजपत्रकीय दरास** व प्रस्तावास वाचा क्र.१ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**अमिता दगडे-पाटील**
**आयुक्त तथा प्रशासक**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-४६ क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले जयंती उत्सव २०२३ निमित्त भव्य स्टेज उभारणे, स्टेज, लाईटींग, फोकस, लाऊडस्पिकर, दुतर्फा लायटींग टाकणे, जनरेटर व विविध व्यवस्था करणेकामी झालेल्या खर्च रू. **१,७८,१५० /-** मात्रास कार्यात्तर मान्यता देणेकामी आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा.प्रशासक एवढा उशिर का लागतो. कामे होऊन वर्ष होऊन जाते मग मंजूरी घेतात.

म.शाखा अभियंता आर्थिक तरतूद नव्हती आपण सुधारित अंदाजपत्रकात तरतूद केली व नंतर प्रस्ताव तयार केला.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ४७ दिनांक २२/०२/२०२४**

क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले जयंती उत्सव २०२३ यांचे जिल्हा न्यायालय जवळील पुतळयाजवळ संस्कृतीक व प्रबोधनाच्या माध्यमातून जनसामान्यांनामध्ये महापुरुषांचे विचार पोहचवण्यासाठी दि.११ एप्रिल २०२३ रोजी प्रबोधनावर कार्यक्रमासाठी विद्युत रोषणाई,लाईटिंग ,फोकस,स्टेज,इ व्यवस्था करणे बाबत संयुक्त जयंती उत्सव समिती,धुळे व म.सहाय्यक आयुक्त समाज कल्याण,धुळे यांचे निवेदन प्राप्त आहे.

त्यानुसार सदर ठिकाणी अनुषंगिक कामे म.आयुक्त सो यांच्या सूचनेनुसार क्रांतिसूर्य म.ज्योतिबा फुले जयंती उत्सव २०२३ निमित्त मे ,धन्यलक्ष्मी मंडप & डेकोरेटर्स,धुळे ठेकेदार यांचेकडून विनानिविदा करणे करून घेण्यात आलेले आहे.

तरी सदरचे कामास बाजारभावानुसार **रु.१,७८,१५० /-** मात्र झालेल्या खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम नियम ६७ ( क ) कार्यात्तर मान्यता वाचा क्र.१ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी. **सही/- x x x**

**अमिता दगडे-पाटील**
**आयुक्त तथा प्रशासक**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-४७ अल्पसंख्याक नागरी क्षेत्र विकास अंतर्गत सन २०२३-२४ अंतर्गत अन्सारी अब्दुल वाहीद यांचे घरापासून ते अब्दुला शेख गुलाब यांच्या घरापावेतो रस्ता कॉक्रीट करणेकामी निविदा दर मागविण्यात आले.त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

म.शहर अभियंता यात 100% अनुदान शासनाकडून प्राप्त होणार आहे. यासाठी शासनाने कामाची निश्चीती करुन दिली होती. त्याप्रमाणे ई निविदा मागवली होती. यात हेमंत राजाराम बागुल यांचे दर अंदाजपत्रकीय दराने आले आहे. शिफारस व मंजूरीसाठी सादर.

म.कार्यकारी अभियंता सदर प्रस्तावास मान्यता देण्यात यावी.

मा.प्रशासक सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ४८ दिनांक २२/०२/२०२४**

अल्पसंख्याक नागरी क्षेत्र विकास अंतर्गत सन २०२३-२४ अंतर्गत अन्सारी अब्दुल वाहीद यांचे घरापासून ते अब्दुला शेख गुलाब यांच्या घरापावेतो रस्ता कॉक्रीट करणेचे कामास

म. जिल्हाधिकारी सो., यांच्या कडील पत्र क्र. १२ / क / कक्ष – ५ / नपाप्र / बांध / १४५६ दि.१९/१२/२०२३ अन्वये उक्त कामाच्या खर्चास रक्कम रु.३९,९३,६१३/- मात्र रक्कमेस आर्थिक व प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

उक्त कामाबाबत शहर अभियंता मनपा धुळे यांचे पत्र क्र. ३८२ दि.३०/११/२०२३ अन्वये रक्कम रुपये ३९,९३,६१३/- तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

यात विहित कार्यालयीन व ई निविदा प्रक्रियेनुसार **हेमंत राजाराम बागूल** यांचे दर **अंदाजपत्रकीय** दराने आहे. सबब कंत्राटदार **हेमंत राजाराम बागूल** यांची **अंदाजपत्रकीय दरास** व प्रस्तावास वाचा क्र.१ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**अमिता दगडे-पाटील**
**आयुक्त तथा प्रशासक**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-४८ — अल्पसंख्याक नागरी क्षेत्र विकास अंतर्गत सन २०२३-२४ अंतर्गत प्रभाग क्रमांक १२ मध्ये नॅशनल उर्दु हायस्कूलच्या मोकळया जागोवसर संरक्षण भिंत बांधणेकामी निविदा दर मागविण्यात आले.त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालवर निर्णय घेणे.

म.नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

म.शहर अभियंता — ही जागा मनपा मालकीची आहे. शासनाकडून बांधकामासाठी निधी उपलबध झाला आहे. ई निविदा मागवली होती. यात हेमंत राजाराम बागुल यांचे दर अंदाजपत्रकीय दराने आलेले आहे. शिफारस व मंजूरीसाठी सादर.

म.कार्यकारी अभियंता — सदर प्रस्तावास मान्यता देण्यात यावी.

मा.प्रशासक — सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ४९ दिनांक २२/०२/२०२४**

अल्पसंख्याक नागरी क्षेत्र विकास अंतर्गत सन २०२३-२४ अंतर्गत प्रभाग क्रमांक १२ मध्ये नॅशनल उर्दु हायस्कूलच्या मोकळया जागेवर संरक्षण भिंत बांधणेचे कामास म. जिल्हाधिकारी सो., यांच्या कडील पत्र क्र. १२ / क / कक्ष – ५/ नपाप्र/बांध / दि.०८/०१/२०२४ अन्वये उक्त कामाच्या खर्चास रक्कम रु.४९,९९,२३४/- मात्र रक्कमेस आर्थिक व प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

उक्त कामाबाबत शहर अभियंता मनपा धुळे यांचे पत्र क्र. ७०२ दि.२१-१२-२०२३ अन्वये रक्कम रुपये ४९,९९,२३४/- तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

यात विहित कार्यालयीन व ई निविदा प्रक्रियेनुसार **हेमंत राजाराम बागूल** यांचे दर **अंदाजपत्रकीय** दराने आहे. सबब कंत्राटदार **हेमंत राजाराम बागूल** यांची **अंदाजपत्रकीय दरास** व प्रस्तावास वाचा क्र.१ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**अमिता दगडे-पाटील**
**आयुक्त तथा प्रशासक**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-४९ अल्पसंख्याक नागरी क्षेत्र विकास अंतर्गत सन २०२३-२४ अंतर्गत प्रभाग क्रमांक १९ मध्ये पठाण किराणापासून ते रफीक ड्रायव्हर यांच्या घरापावेतो रस्ता कॉक्रीटीकरण कामी निविदा दर मागविण्यात आले.त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

म.शहर अभियंता यात आपले अंदाजपत्रक 29 लाख 94 हजाराचे होते ई निविदा प्रसिध्द केली होती. अे के. सैफी यांचे अंदाजपत्रकीय दर आल्याने शिफारस व मंजूरीसाठी सादर

म.कार्यकारी अभियंता सदर प्रस्तावास मान्यता देण्यात यावी.

मा.प्रशासक सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ५० दिनांक २२/०२/२०२४**

अल्पसंख्याक नागरी क्षेत्र विकास अंतर्गत सन २०२३-२४ अंतर्गत प्रभाग क्रमांक १९ मध्ये पठाण किराणापासून ते रफीक ड्रायव्हर यांच्या घरापावेतो रस्ता कॉक्रीटीकरण करणेचे कामास म. जिल्हाधिकारी सो., यांच्या कडील पत्र क्र. १२ / क / कक्ष — ५ / नपाप्र / बांध /१४५६ दि.१९/१२/२०२३ अन्वये उक्त कामाच्या खर्चास रक्कम रु.२९,९४,०४०/- मात्र रक्कमेस आर्थिक व प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

उक्त कामाबाबत शहर अभियंता मनपा धुळे यांचे पत्र क्र. ३८३ दि.३०-११-२०२३ अन्वये रक्कम रुपये २९,९४,०४०/- तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

यात विहित कार्यालयीन व ई निविदा प्रक्रियेनुसार **अे.के.सैफी** यांचे दर **अंदाजपत्रकीय** दराने आहे. सबब कंत्राटदार **अे.के.सैफी** यांची **अंदाजपत्रकीय दरास** व प्रस्तावास वाचा क्र.१ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी. **सही/- x x x**

**अमिता दगडे-पाटील**
**आयुक्त तथा प्रशासक**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-५० अल्पसंख्याक बहूल नागरी क्षेत्र विकास अंतर्गत सन २०२३-२४ अंतर्गत धुळे शहरातील मोगलाई कब्रस्थान येथे संरक्षण भिंत बांधणेकामी निविदा दर मागविण्यात आले.त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

म.शहर अभियंता यासाठी शासनाने मंजूरी दिली आहे. मंजूरीमध्ये मुलभुत सोई सुविधा अंतर्गत अनुदान प्राप्त झाले आहे. 49 लाख 99 हजाराची निविदा आहे. आशिष एम. पटवारी यांचे दर अंदाजपत्रकीय दर आल्याने शिफारस व मंजूरीसाठी सादर.

म.कार्यकारी अभियंता सदर प्रस्तावास मान्यता देण्यात यावी.

मा.प्रशासक सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ५१ दिनांक २२/०२/२०२४**

अल्पसंख्याक बहूल नागरी क्षेत्र विकास अंतर्गत सन २०२३-२४ अंतर्गत धुळे शहरातील मोगलाई कब्रस्थान येथे संरक्षण भिंत बांधणेचे कामास म. जिल्हाधिकारी सो., यांच्या कडील पत्र क्र. १२ / क / कक्ष — ५ /नपाप्र/बांध/ दि.०८/०१/२०२४ अन्वये उक्त कामाच्या खर्चास रक्कम रु.**४९,९९,२३४/-** मात्र रक्कमेस आर्थिक व प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

उक्त कामाबाबत शहर अभियंता मनपा धुळे यांचे पत्र क्र. ७०० दि.२१-१२-२०२३ अन्वये रक्कम रुपये **४९,९९,२३४/-** तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

यात विहित कार्यालयीन व ई निविदा प्रक्रियेनुसार **आशीष एम.पटवारी** यांचे दर **अंदाजपत्रकीय** दराने आहे. सबब कंत्राटदार **आशीष एम.पटवारी** यांची **अंदाजपत्रकीय दरास** व प्रस्तावास वाचा क्र.१ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी. **सही/- x x x**

**अमिता दगडे-पाटील**
**आयुक्त तथा प्रशासक**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-५१ मुलभूत सोई सुविधा प्रभाग क्रमांक ९ सर्व्हे क्रमांक ४३८ खुल्या जागेत कंपाऊड वॉल करणेकामी निविदा दर मागविण्यात आले.त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

म.शहर अभियंता यासाठी शासकीय अनुदान आपल्याला प्राप्त आहे. यामध्ये 49 लाख 97 हजाराचे काम आहे. यात ऐ.के. सैफी यांचे दर अंदाजपत्रकीय दराने आले आहे. शिफारस व मंजूरीसाठी सादर.

म.कार्यकारी अभियंता सदर प्रस्तावास मान्यता देण्यात यावी.

मा.प्रशासक सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ५२ दिनांक २२/०२/२०२४**

मुलभूत सोई सुविधा प्रभाग क्रमांक ९ सर्व्हे क्रमांक ४३८ खुल्या जागेत कंपाऊड वॉल करणेचे कामास म. जिल्हाधिकारी सो., यांच्या कडील पत्र क्र. १२ / क / कक्ष — ५ / नपाप्र / बांध / १३१२ दि.२०/११/२०२३ अन्वये उक्त कामाच्या खर्चास रक्कम रु. **४९,९७,०८०/-** मात्र रक्कमेस आर्थिक व प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

उक्त कामाबाबत शहर अभियंता मनपा धुळे यांचे पत्र क्र. ८८ दि.०९/०८/२०२३ अन्वये रक्कम रुपये **४९,९७,०८०/-** तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

यात विहित कार्यालयीन व ई निविदा प्रक्रियेनुसार **अे.के.सैफी** यांचे दर **अंदाजपत्रकीय** दराने आहे . सबब कंत्राटदार **अे.के.सैफी** यांचे **अंदाजपत्रकीय दरास** व प्रस्तावास वाचा क्र.१ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी. **सही/- x x x**

**अमिता दगडे-पाटील**
**आयुक्त तथा प्रशासक**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-५२ विकास शुल्क निधी अंतर्गत थोर स्वांतत्र्यवीर वि.दा.सावरकर स्मारक(पुतळा) विकसित करणेकामी निविदा दर मागविण्यात आले.त्याबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

म.शहर अभियंता विकासशुल्क निधी अंतर्गत माजी महापौरांनी सदरचे काम सूचवले होते. यात ई निविदा केली होती. त्यात रामेश्वर ट्रेडर्स यांचे 0.99% कमीने सर्वात कमी दर आले आहे. त्याप्रमाणे यासाठी

आर्कीटेक्ट ची नेमणूक करुन त्यांनी या कामाचे अंदाजपत्रक केले आहे. या कामाच्या ठरावामध्ये स्पेसिफिक तरतूद करावी. संबंधीत जो ठेकेदार आहे त्याने काम करतांना आर्कीटेक्ट ने प्रारुप आराखडा तयार केलेला आहे. त्यानुसारच काम करावे. व देयक देतांना संबंधीत आर्कीटेक्टच्या सहमतीनेच स्वाक्षरी देऊन सदरचे बिल अदा करावे असे नमूद करणे आवश्यक राहिल.

मा.प्रशासक — त्यात काय-काय काम करणार आहे?

म.शहर अभियंता — पूर्वीचा चबूतरा काढून नविन चबूतरा करणे. आजूबाजूला डेकोरेशन करणे, कारंजा करणे, छोटा हायमास्ट उभारणे त्या परिसरात संपूर्ण रस्त्याचे डांबरीकरण करणे ते 2 ते 3 कोटीचे इस्टीमेट होते ते कर्टेल करुन इतर गोष्टी कमी करुन 1 कोटी पर्यंत केले आहे. काम करतांना संकल्पना चित्र जसे च्या तसे व्हावे म्हणून संबंधीत आर्कीटेक्टची देखरेख ठेऊन काम केले तर काम चांगल्यापैकी होईल. स्थायी पुढे मंजूरीसाठी सादर.

मा.प्रशासक — ते काम करतांना पोलिस डिपार्टमेंटला कळवून ठेवा तेथे गर्दी असते. तेथे बस थांबा नाही. लोकं पुतळयाच्या कठडयाजवळ थांबतात. तेथे बस थांबा सारखी व्यवस्था करायला लागेल. त्याचाही अंतर्भाव ही करुन घ्या. जेणे करुन प्रॉब्लेम होणार नाही.

म.कार्यकारी अभियंता — सदर प्रस्तावास मान्यता देण्यात यावी.

मा.प्रशासक — सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ५३ दिनांक २२/०२/२०२४**

विकास शुल्क अंतर्गत थोर स्वांतत्र्यवीर वि.दा.सावरकर स्मारक(पुतळा) विकसित करणेचे कामास मा.आयुक्त तथा प्रशासक यांच्या मान्यतेने दि.०५/०१/२०२४ अन्वये उक्त कामाच्या खर्चास रक्कम रु. **१,००,००,०००/-** मात्र रक्कमेस आर्थिक व प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

उक्त कामाबाबत शहर अभियंता मनपा धुळे यांचे पत्र क्र. ७२३ दि.१०-०१-२०२४ अन्वये रक्कम रुपये **९९,९९,८७१/-** तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.सदर कामी ठेकेदाराने **शे.- ०.९९% कमी** दराने निविदा दर भरल्याने सदर काम रक्कम रू.९९,००,८७२/- इतक्या रक्कमेचे आहे.

यात विहित कार्यालयीन व ई निविदा प्रक्रियेनुसार **रामेश्वर ट्रेडर्स** यांचे दर **शे.- ०.९९% कमी** दराने आहे. सबब कंत्राटदार **रामेश्वर ट्रेडर्स** यांचे **शे. -०.९९% कमी दरास** व प्रस्तावास वाचा क्र.१ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे.

तसेच सदरचे काम गुणवत्तापुर्वक व दर्जेदार होण्यासाठी प्रत्येक टप्प्यावर कामाची तपासणी संबंधित नियुक्त वास्तूविशारद यांच्याकडून करून घेण्यात यावी.तसेच सदर चौकातील मोठया प्रमाणावरील रहदारी व गर्दीचे प्रमाण लक्षात घेता त्यानुसार आवश्यक ते बांधकामाचे नियोजन करण्यात यावे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**

**अमिता दगडे-पाटील**

**आयुक्त तथा प्रशासक**

**धुळे महानगरपालिका,धुळे**